# सौ . मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्था

ठाणे महानगरपालिका, ठाणे ,जुनी महानगरपालिका ,स्टेशन रोड , ठाणे
दूरध्वनी कमांक ः२५३३६२११ ,२५३३२६८२





ठाणे महानगर पालिकेच्या राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालय व छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयास संलग्न असलेल्या सौ . मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्था ततकालीन मा . महापौर श्रीयुत . अनंत तरे सो यांच्या अथक प्रयत्नानीं दिनांक १ जानेवारी १९९६ रोजी अस्तित्वत येऊन जुनी महानगर पालिका इमारत स्टेशन रोड ठाणे येथे कार्यान्वित आहे . सदर संस्थेला महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल तसेच इंडियन नर्सिंग कौन्सिल या दोहोंची मान्यता मिळालेली आहे . संस्थेतर्फे ३ १ /२ वर्षाचा जनरल नर्सिंग व मिडवायफ्री हा पदविका अभ्यासक्रम राबविला जात आहे . सदर प्रशिक्षण संस्थेचा आजवरचा उत्तीर्ण होण्याचा निकाल १00% प्रतिवर्षी इतका आहे .



तसेच संस्थेने विविध स्थानिक ,राज्य व राष्ट्रीय स्तरावर आयोजित शैक्षणिक व सांस्कृतिक स्पर्धे मध्ये उस्फुर्तपणे  भाग घेऊन अनेक पारितोषिके मिळविली आहेत .



परिचारिका प्रशिक्षणार्थी



प्रशिक्षीत परिचारिका

सदर संस्था स्थापनेमागचा मूळ उद्देश ठाणे शहरातील व जिल्हयातील दूरवर पसरलेल्या भागातील मुलींना या व्यवसायभिमुख प्रशिक्षण कार्याक्रमातून स्वयंपूर्ण बनविणे असा आहे . या संस्थेद्वारा हा उद्देश काही प्रमाणात सफल होत आहे तथापि अपु-या प्रवेश क्षमतेमूळे सदरचा उद्देश पूर्णपणे सफल होऊ शकत नाही . दरम्यान ठाणे जिल्हयातील जनतेच्या मागणी नुसार उपलब्ध असलेली २० प्रवेश क्षमता अपुरी पडत असल्याने दिनांक ७ . ९ . २००४ रोजी इंडियन नर्सिंग कौन्सिलच्या तज्ञ पथका द्वारे सर्वेक्षण करण्यात आले व प्रथम वर्ष जनरल नर्सिंगच्या प्रशिक्षणार्थीची प्रवेश क्षमता  ३० करणे करिता मान्यता देण्यात आली .



रूग्णालयातील परिचर्या



सामाजिक परिचर्या

संस्थे मधून यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेल्या परिचारिकांकरिता महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय कळवा येथे २ वर्ष इतकी सेवा करणे बंधनकारक आहे . त्यामुळे अल्प

मोबदल्यात महापालिकेला प्रशिक्षीत परिचारिकांची सेवा उपलब्ध करून देणे शक्य होते. तसेच सदर संस्थेमधून उत्तीर्ण झालेल्या परिचारिकांची ब-याच नामांकित रूग्णालयाकडून मागणी होत आहे.

ठाणे शहर व जिल्हा यातील वाढत्या आरोग्य सेवेची गरज लक्षात घेऊन ही संस्था स्थापन झाली असली तरी या भागातील मुलींना व्यवसायभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमातून स्वयंपूर्ण बनवणे हाही उददेश संस्थास्थापनेमागे होता. तोही काही प्रमाणात सफल होत आहे. येथे प्रतिवर्षी ३० विद्यार्थिनी प्रशिक्षणासाठी दाखल होतात. आजपावेतो संस्थेमध्ये ३४१ विद्यार्थिनींनी प्रवेश घेतला असून २४७ विद्यार्थिनींनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे. सद्या संस्थेमध्ये १२० विद्यार्थिनी प्रशिक्षण घेत आहेत.

आज संस्थेकडे प्राचार्या श्रीमती अरूंधती गुरव उपप्राचार्या श्रीमती प्राची धारप आणि अन्य सात नर्सिंग टयुटर असून हा सर्व शिक्षकवृंद येथील अध्यापनाची जबाबदारी संभाळतात.

## अधिकारी व कर्मचारी यांची सूची

| अनु क | पदाचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | प्राचार्या | १ |
| २ | उप प्राचार्या | १ |
| ३ | नर्सिंग टयुटर क्लीनीकल इंस्ट्रक्टर | ५ |
| ४ | लिपीक | १ |
| ५ | ग्रंथपाल | १ |
| ६ | वॉर्डन | १ |
| ७ | शिपाई | २ |
| ८ | वाहन चालक | १ |
| ९ | सुरक्षा रक्षक | ३ |
| १० | सफाई कामगार | ६ |
| | **एकूण** | २२ |

संस्था परिचारिका अभ्यासक्रम व आरोग्यसेवे व्यतीरिक्त सामाजिक जाणीवेचे भान ठेऊन विविध आरोग्यविषयक समस्यांविषयी ठाणे व परिसरातील जनतेमध्ये पथनाटय आरोग्यविषयक प्रदर्शने यायोगे समाजजागृती करते. मौखिक आरोग्य एडस, स्त्रीभ्रूण हत्या ,पाण्याचा विनीयोग ,पर्यावरण मानसिक आरोग्य, स्त्री सक्षमीकरण अश्या अनेक विषयावर संस्थेने उत्कृष्ट पथनाटये सादर करून ठाण्यातील जनतेचा आणि मान्यवरांचा विश्वास संपादन केला आहे.





परिचारिका प्रशिक्षणार्थी शाळेतील विद्यार्थ्यांसमोर पथनाटय सादर करताना

महानगर पालिकेच्या आरोग्य विभागा तर्फे आयोजित विविध आरोग्य संवर्धन कार्यकमात संस्थेचा संपुर्ण सहभाग असतो व तसेच संस्थे तर्फे सर्व आरोग्य दिन साजरे करण्यात येतात .




एकात्मिक लोकसंख्या व बाल आरोग्य कार्यकमा अंतर्गत आय.पी.डी.पी. सोसायटी व ठाणे महानगरपालिका यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या विविध कार्यकमात संस्थेने संपूर्ण सहभाग घेऊन सदर कार्यकमा अंतर्गत ठाणे कल्याण डोंबिवली उल्हासनगर व भिवंडी महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या परिचारिकांचे कौशल्य वाढ व विकास प्रशिक्षण आयोजित करून एकूण २२३ परिचारिका प्रशिक्षीत केल्या. ठाणे महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या आंगणवाडी सेविका व बालवाडी शिक्षीका सेविका अश्या एकूण २४९ जणींना प्रशिक्षण दिले.

जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे कार्य रत असलेल्या एकूण २८४ महिला व पुरूष आरोग्यसहाय्यकांसाठी प्रशिक्षण आयोजित केले.






ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आतकोनेश्वर विभागातील १२ दाईना प्रशिक्षीत करण्याची महत्वाची जबावदारी संस्थेने पार पाडली आहे.



संस्थेची लायब्ररी



प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक प्रतिकृती

संस्थेकडे आज १२०४पुस्तके असलेली संपन्न लायब्ररी आहे. विवीध विषयांसाठीच्या प्रात्यक्षिकांसाठी प्रयोगशाळा वसतीगृह मेस इत्यादी सुविधा आहेत विद्यार्थिनींना गरम पाण्याचा पुरवठा होण्याच्या दृष्टीने सोलार सिस्टीम उत्कृष्टरित्या कार्यरत आहे. विवीध दृकश्राव्य माध्यमेही संस्थेमध्ये अध्ययनासाठी वापरली जात असून तीन संगणकही संस्थेकडे आहेत. विद्यार्थिनींना प्रात्यक्षिक अनुभवांसाठी विवीध हॉस्पीटलमध्ये ने आण करण्यासाठी पन्नास आसनक्षमता असलेली वस उपलब्ध आहे.





**सोलार सिस्टीम** **संस्थेची बस**

ईंडियन नर्सिंग कौन्सिल सध्या अस्तित्वात असलेला पदविका अभ्यासक्रम शिकवित असलेल्या संस्थाना जिथे आवश्यक असलेल्या मुलभूत सोइसुविधा व आवश्यक रूग्णसंख्या असणा या संलग्नीत रूग्णालयाचा विचार करून पदविका अभ्यासक्रमा बरोबरच पदवी अभ्यासक्रम चालु करण्यासाठी परवानगी देणार आहे. भविष्यात सौ. मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेमध्ये पदवी अभ्यासक्रम सुरू करण्याच्या दृष्टीने मा. महासभा ठराव कं. ८ दिनांक २०.५.२००४ अन्वये ठाणे महानगर पालिकेने बीएससी नर्सिंग अर्हता प्राप्त २ प्रशिक्षकांना (प्राचार्यासह ) एमएससी नर्सिंग या पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमास पुरस्कृत केले आहे. वरिलप्रमाणे ठाणे महानगर पालिकेच्या सौ. मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेत कार्यरत असलेल्या प्राचार्यासह एकुण पॉच जणानां पुरस्कृत केले आहे.

परिचारिकांची मागणी उत्तरोत्तर वाढत आहे. वैद्यकिय क्षेत्रात नवनवीन विशेष तज्ञ शाखेची निर्मिती होत असल्यामुळे तज्ञ परिचारिकांची गरजही वाढत आहे. पुढील काही वर्षात अश्या परिचारिकांची मागणी वाढणार असुन समाजाची गरज लक्षात घेता परिचर्या प्रशिक्षणास प्राधान्य देणे अत्यावश्यक आहे. ह्या सर्व बावी लक्षात घेता खालील नविन उपक्रम प्रस्तावित करण्यात आले आहे.

## सौ. मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेचे इतर प्रस्तावित उपक्रम

१. जनरल नर्सिंग व मिडवायफी ह्या पदविका अभ्यासक्रम प्रवेश संख्या ३० वरून ५० करणे
२. पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमास सुरू करणे
३. अल्पमुदृत विशेष प्राविण्य अभ्यासक्रम उदा. Critical care, Operation Theater Technique, Neonatal nursing ,Midwifery Nurse practiotioner etc.
४. समाजात उपरोक्त परिचर्या प्रशिक्षण बद्दल माहिती व जनजागृती करण्यासाठी परिचारिका जनसंर्पक अधिकारीची नेमणूक ही करणे काळाची गरज भासत आहे.
५. ईंडियन नर्सिंग कौन्सिलच्या नियमानुसार संस्थेची जागा अपुरी पडत असल्यामुळे नविन इमारत असणे अत्यंत आवश्यक आहे.

भविष्यात प्रस्तावित नविन उपक्रमासाठी ईंडियन नर्सिंग कौन्सिलच्या नियमानुसार पदविका ,पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमा राबविण्या साठी स्वत्रंत्र इमारत व सोई सुविधा असणे आवश्यक

आहे. तसेच वरिल अभ्यासक्रमा राबविण्या साठी ईंडियन नर्सिंग कौन्सिलच्या नियमानुसार आवश्यक शिक्षक व कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे.

## सौ. मिनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेची उल्लेखनिय कामगिरी

१. जानेवारी १९९८ पासून २४७ विदयार्थिनींचे प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण. सद्या ९० विदयार्थिनीं संस्थेत प्रशिक्षण घेत आहेत. ठाणे शहर व ठाणे जिल्हा या भागातील मुलींना व्यवसायभिमुख प्रशिक्षण कार्यक्रमातून स्वयंपूर्ण बनविण्याचा ठाणे महानगरपालिकेचा उददेश सफल होण्याच्या दृष्टीकोनातून संस्थेची यशस्वी वाटचाल.

२. सप्टेंबर १९९८ पासून सप्टेंबर २००४ पर्यंतच्या विद्यार्थिनी परिषदेच्या राज्यपातळीवरील प्रत्येक अधिवेशना अंतर्गत शैक्षणिक तसेच विविध गुणदर्शन स्पर्धांमध्ये अनेक प्रथम व दिवतीय पारितोषिके.




३. सप्टेंबर २००३ मध्ये परिचारिका परिषदेच्या राज्यपातळीवरील अधिवेशनात तसेच जयपूर येथे झालेल्या राष्ट्रीय अधिवेशनातही संस्थेच्या नर्सिंग टयुटर श्रीमती अनिता थत्ते आणि श्रीमती प्राजक्ता सामंत यांनी सादर केलेल्या दोन स्वतंत्र कलाकृतींना प्रथम पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

४. ठाणे शहर तसेच भिवंडी उल्हासनगर डोंबिवली वाशी महानगरपालिकांच्या हददीत एडस, स्त्री भ्रूण हत्या प्रतिबंध, अल्पवयात होणारे विवाह, महिला सबलीकरण, गुटखाबंदी, पर्यावरणाचे महत्व,जलसाक्षरता इत्यादी विषयावर पथनाटय सादरीकरण व समाजजागृती व प्रबोधन उपक्रम.

५. एकात्मिक लोकसंख्या व बाल आरोग्य कार्यक्रमा अंतर्गत आय.पी.डी.पी.सोसायटी व ठाणे महानगरपालिका यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमात संस्थेने संपूर्ण सहभाग घेऊन सदर कार्यक्रमा अंतर्गत ठाणे कल्याण डोंबिवली उल्हासनगर व भिवंडी महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या परिचारिकांचे कौशल्य वाढ व विकास प्रशिक्षण आयोजित करून एकूण २२३ परिचारिका प्रशिक्षीत केल्या.

६ . ठाणे महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या आंगणवाडी सेविका व बालवाडी शिक्षीका सेविका अश्या एकूण २४९ जणींना प्रशिक्षण दिले .

७ .जिल्हा परिषद ठाणे यांच्याकडे कार्यरत असलेल्या एकूण २८४ महिला व पुरूष आरोग्यसहाय्यकांसाठी प्रशिक्षण आयोजित केले .

८ .ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील आतकोनेश्वर विभागातील १२ दाईना प्रशिक्षीत करण्याची महत्वाची जबाबदारी संस्थेने पार पाडली आहे .

९ .सप्टेंबर २००४- २००५ मध्ये आयोजित कराड येथे झालेल्या राज्यस्तरीय विद्यार्थिनी परिचर्या परिषदेमध्ये सर्वाधिक पारितोषिके मिळविणारी संस्था म्हणून संस्थेचा गौरव करण्यात आला .

१० .सन २००६ मध्ये नववर्षदिनानिमीत्त कोपिनेश्वर मंडळ आयोजीत रथचित्र स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक

११ . सन २००६ मध्ये प्राचार्या श्रीमती गुरव यांना पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रसुती शास्त्र या विषयातील शोध निबंधासाठी प्रथम पारितोषिके देऊन गौरविण्यात आले .

१२ . सन २००८ मध्ये नववर्षदिनानिमीत्त कोपिनेश्वर मंडळ आयोजीत रथचित्र स्पर्धेमध्ये उत्तेजर्नाथ पारितोषिक

१३ . सप्टेंबर २००६- २००७ मध्ये आयोजित लोणी येथे झालेल्या राज्यस्तरीय विद्यार्थिनी परिचर्या परिषदेमध्ये ९ पारितोषिके मिळाली .

१४ . नोव्हेंबर २००८ मध्ये परिचारिका परिषदेच्या राष्ट्रीय पातळीवरील अधिवेशनात संस्थेच्या प्राचार्या व उपप्राचार्यासह नर्सिंग टयुटर यांनी सादर केलेल्या १६ स्वतंत्र भित्तीपत्रकां पैकी १२ भित्तीपत्रकानां पारितोषिके देऊन गौरविण्यात आले तसेच परिषदेमध्ये सर्वाधिक पारितोषिके मिळविणारी संस्था म्हणून संस्थेचा गौरव करण्यात आला .

१५ . सन २००९ मध्ये उपप्राचार्या श्रीमती प्राची धारप यांना पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमात सामाजिक परिचर्या या विषयात प्रथम तसेच द्वितिय वर्ष पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रथम पारितोषिके देऊन गौरविण्यात आले .

